पुढारी

# के. बी. जोशी इन्स्टिट्यूटचा गौरव

**पुणे :** क्वीक हील फाउंडेशनच्या वतीने आयोजित उपक्रमात महर्षी कर्वे स्त्री शिक्षण संस्थेच्या के. बी. जोशी इन्स्टिट्यूट ऑफ इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजीचा गौरव करण्यात आला. प्राचार्या डॉ. अनघा वैद्य यांना उत्कृष्ट प्राचार्य,क्यूएचएफ केबीजेआयआयटी क्लबला बेस्ट न्यू क्लबचा द्वितीय उपविजेतपदाचा मान मिळाला. ज्ञानदा सुर्वे यांना उत्कृष्ट अध्यक्षाचे प्रथम उपविजेतपदाचे पारितोषिक मिळाले.

याशिवाय, सायबर सुरक्षा जनजागृती, समाजप्रबोधन व आऊटरिच उपक्रमामध्ये उल्लेखनीय कार्य केल्याबद्दल भक्ती थोपटे आणि सेजल मोटेकर यांच्या टीमला बेस्ट आऊटरिच वॉरियर टीमच्या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. जून २०२५ ते ऑक्टोबर २०२५ या कालावधीत एकूण २० विद्यार्थ्यांच्या टीमने सातत्याने कार्य करत समाजामध्ये सायबर सुरक्षेबाबत व्यापक जनजागृती केली. या उपक्रमांद्वारे २४ हजार ३८२ विद्यार्थी आणि सुमारे २,००० नागरिकांना सुर-क्षेचे धडे देण्यात आले.

सायबर सुरक्षा उपक्रमांतर्गत विद्यार्थ्यांनी सायबर आरती, पथनाट्य, तसेच जनजागृती रॅली (मार्च) यांसारख्या उपक्रमांद्वारे समाजामध्ये सायबर सुरक्षेबाबत जागरूकता निर्माण केली. हे उपक्रम शाळांमध्ये तसेच विविध समाजघटकांपर्यंत पोहोचविण्यात आले असून, विद्यार्थ्यांनी नागरिकांशी थेट संवाद साधून सायबर सुरक्षेचे महत्त्व पटवून दिले. सायबर क्लब प्रतिनिधी प्रा. मनाली सपकाळ यांनी यात मोलाचे योगदान दिले.

Pune Edition
Apr 02, 2026 Page No. 05
Powered by: erelego.com